# संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाची जाहिरात

## महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई भरती सन २०१९

## पोलीस अधीक्षक कार्यालय रत्नागिरी.

जाहिरात क्रमांक- रत्नागिरी पो.भ/१/२०१९/ रत्नागिरी दिनांक

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ व त्यानंतर शासनाने वेळोवेळी आणि दिनांक १८.१.२०१९ व दिनांक-४.७.२०१९ च्या आदेशांन्वये केलेल्या सुधारणानुसार पोलीस अधीक्षक ,रत्नागिरी यांच्या आस्थापनेवर सन २०१९ मध्ये पोलीस शिपाई संवर्गात रिक्त होणारी (६६) पदे भरण्यासाठी खालीलप्रमाणे पोलीस शिपाई पदाची भरती आयोजित करण्यात येत आहे.

**१) पोलीस शिपाई :**

| तपिशल | अ.जा. | अ.ज. | वि.जा.-अ | भ.ज.-ब | भ.ज.-क | भ.ज.-ड | वि.मा.प्र | इमाव | एसईबीसी | इडब्ल्यूएस | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण | १८ | १३ | ५ | ० | ३ | ० | ६ | ० | ९ | ७ | ५ | ६६ |
| कप्पीकृत आरक्षण | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ५ | ३ | २ | ० | २ | ० | ३ | ० | ५ | ४ | २ | २६ |
| महिला | ५ | ४ | २ | ० | १ | ० | २ | ० | ३ | २ | २ | २१ |
| खेळाडू | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| प्रकल्पग्रस्त | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| माजी सैनिक | ३ | २ | १ | ० | ० | ० | १ | ० | १ | १ | १ | १० |
| अंशकालीन पदवीधर | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| पोलीस पाल्य | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| गृहरक्षक दल | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| अनाथ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| एकूण | १८ | १३ | ५ | ० | ३ | ० | ६ | ० | ९ | ७ | ५ | ६६ |

अ) उपरोक्त पदे ही दिनांक ३१/१२/२०१९ अखेरपर्यंत रिक्त होणाऱ्या संभाव्य पदांची गणना करुन जाहीर करण्यात आलेली आहे. सदरची रिक्त पदे सामाजिक आरक्षणांतर्गत मागील अनुशेष व बिंदुनामावलीनुसार निश्चित करण्यात आलेली आहेत.

ब) अंतीम निवड यादीतील प्रवर्गनिहाय गुणवत्ता क्रमानुसार येणाऱ्या उमेदवारांना या घटकाच्या आस्थापनेवर जसजशी पदे रिक्त होतील तसतशी प्रवर्गनिहाय उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल. सदर निवड यादीतील उमेदवाराची निवड तात्पुरती (Provisional selection) असेल. निवड यादीमध्ये उमेदवाराच्या नावाचा समावेश झाला म्हणून नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये.

www.nmk.co.in

क) पदोन्नतीवरील आरक्षणा संदर्भात शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ बाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहून व मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी जनहित याचिका क्रमांक १७५/२०१८ व इतर संलग्न याचिकांमध्ये दिनांक २७.०६.२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेबाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो. व त्यांची माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल. त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्याचा अधिकार आहे.

ड) या कार्यालयाच्या आस्थापनेवर बॅन्ड पथकातील ०३ रिक्त पदे भरतीसाठी उपलब्ध आहेत.

२) महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस शिपाई पदासाठी सेवाप्रवेश नियम-२०११ वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणासह, (शा.नि.क्र.जेएलई-१०१५/१६६६/प्र.क्र.३०२/तुरुंग-१, दि.१५/०१/२०१६ अन्वये) लागु आहेत. सर्व सेवाप्रवेश नियम सुधारणासह www.mahapolice.gov.in या संकेत स्थळावर (Home Page) वर व www.ratnagiripolice.gov.in वर उपलब्ध असुन ते त्या त्या पदावरील भरतीसाठी आवेदन अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांना लागू राहतील.

**महत्त्वाची टिप :-**

पोलीस शिपाई भरती करण्याबाबत कोणीही पैशाची किंवा अन्य कोणत्याही स्वरुपाची मागणी केल्यास संबधित उमेदवाराने त्याबाबतची माहिती अॅन्टीकरप्शन ब्युरो, रत्नागिरी यांना दुरध्वनी क्रमांक ०२३५२२२२८९३ वर त्वरीत संपर्क साधून तक्रार करावी. तसेच, या संदर्भात उमेदवार पोलीस अधीक्षक याचे कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी किंवा अध्यक्ष, पोलीस भरती सन-२०१९ तथा पोलीस अधीक्षक /अपर पोलीस अधीक्षक/ पोलीस उपअधीक्षक, रत्नागिरी यांचेशी संपर्क साधून तक्रार करु शकतील. तसेच अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयात ०२२-२२०२३६३७ या दुरध्वनी क्रमांकावरही तक्रार करता येईल.

उमेदवारांना काही अडचणी भासल्यास खालील दिलेल्या हेल्पलाईल नंबरवर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

| अ.क्र. | संस्था / कार्यालयाचे नाव | दुरध्वनी / मोबाईल क्रमांक |
|---|---|---|
| १ | पोलीस अधीक्षक कार्यालयातील दूरध्वनी क्रमांक (कार्यालयीन वेळेत) | ०२३५२-२७१२५७ |

( डॉ.प्रविण मुंढे )
पोलीस अधीक्षक,रत्नागिरी

www.nmk.co.in